**ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायत/ नगरपरिषदेमध्ये झाल्यानंतर प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घरकुल बांधकामासंदर्भात अवलंबावयाची कार्यपध्दती**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः प्रआयो-२०१७/प्र.क्र.२४१/योजना-१०**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: ०७ नोव्हेंबर, २०१७.

**वाचा -**

१) उप सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे क्र.झेडपीबी-२०१५/प्र.क्र.९३/पंरा-५, दि.२१ ऑक्टोबर, २०१५

२) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे क्र.३८३/ग्रा.पं.अ.वि./२०१६, दि.७.७.२०१६.

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे क्र.रआयो-२०१६/प्र.क्र.६६३/बांधकामे, दि.२ मार्च, २०१७.

**प्रस्तावना-**

सन २०१६-१७ पासून केंद्र पुरस्कृत राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) राबविली जात आहे. सदर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील घरकुल पात्र कुटूंबांना घरकुल बांधकामासाठी अर्थसहाय दिले जाते. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) करिता लाभार्थ्यांची निवड ही सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ च्या माहितीच्या आधारे केली जाते.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ही केवळ ग्रामीण भागासाठी म्हणजेच ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणारी योजना आहे. एखाद्या ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायत/नगरपरिषदेमध्ये झाल्यास तेथील घरकुल पात्र कुटूंबांना कशाप्रकारे लाभ द्यावा, याबाबत जिल्हा स्तरावरून मार्गदर्शन

मागविण्यात आले आहे. ही बाब विचारात घेऊन ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायत/नगरपरिषदेमध्ये झाल्यास तेथील घरकुल पात्र कुटूंबांना कशाप्रकारे लाभ द्यावा यासंदर्भात सुचना निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक-**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ही केवळ ग्रामीण भागासाठी म्हणजेच ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणारी योजना आहे. एखाद्या ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायत/नगरपरिषदेमध्ये झाल्यास तेथील घरकुल पात्र कुटूंबांना कशाप्रकारे लाभ द्यावा, याबाबत जिल्हा स्तरावरून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. ही बाब विचारात घेऊन ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायत/नगरपरिषदेमध्ये झाल्यास तेथील घरकुल पात्र कुटूंबांना कशाप्रकारे लाभ द्यावा यासंदर्भात खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत-

१) ग्रामपंचायतीचे ज्या तारखेला नगरपंचायत/नगरपरिषदेमध्ये रूपांतर झाले आहे त्या तारखेनंतर प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत लाभार्थ्यांना प्रशासकीय मंजूरीचे आदेश निर्गमित करण्यात येऊ नयेत.

२) ग्रामपंचायतीचे ज्या तारखेला नगरपंचायत/नगरपरिषदेमध्ये रूपांतर झाले आहे त्या तारखेपूर्वी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत लाभार्थ्यांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे परंतु पहिला हप्ता वा प्रत्यक्ष कामास जरी सुरूवात झाली नसली तरी अशा लाभार्थ्यांना विहित कार्यपध्दतीने अर्थसहाय उपलब्ध करून देण्यात यावे व लाभार्थ्यांकडून घरकुलाची कामे विहित कालावधीत पूर्ण करून घेण्यात यावीत.

३) ग्रामपंचायतीचे ज्या तारखेला नगरपंचायत/नगरपरिषदेमध्ये रूपांतर झाले आहे त्या तारखेपूर्वी प्रशासकीय मंजूर, पहिला हप्ता अदा झाला आहे, लाभार्थ्यांने बांधकामास प्रत्यक्ष

सुरूवात केली आहे, अशा सर्व लाभार्थ्यांना उर्वरित हप्ते निकषाप्रमाणे अदा करावीत तसेच घरकुलाचे बांधकाम विहित कालावधीत पूर्ण करून घेण्यात यावीत.

४) ग्रामपंचायतीचे नगरपंचायत/नगरपरिषदेमध्ये रूपांतर झाल्यामुळे प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) च्या लाभापासून वंचित राहिलेल्या कुटूंबांना नगरपंचायत/नगरपरिषदे अंतर्गत असलेल्या घरकुल योजनेतून लाभ देता यावा यासाठी अशा कुटूंबांची यादी संबंधित नगरपंचायतीकडे/नगर विकास विभागाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात यावी.

**उपरोक्त सुचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०७१२३९०६७३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2017.11.08 16:18:30 +05'30'

**(अ.मा.काळे)**
अवर सचिव, ग्राम विकास विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व विधानसभा व विधान परिषद सदस्य
६) मा.मुख्य सचिव, यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
८) महालेखापाल (लेखापरीक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
१०) महालेखापाल (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३) अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व)
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य जीवनन्योती अभियान, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई
१८) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सी.बी.डी.,बेलापूर, नवी मुंबई
१९) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२१) ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२२) उप सचिव, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
२४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२५) अतिरिक्त संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
२६) निवड नस्ती (कार्यासन योजना-१०)